**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१ / सांगली | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील<br>शितल, दामाणी हायस्कूलचे पूर्वेस, चांदणी चौक,<br>जि. सांगली - ४१६ ४१६ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | हजर |

अपीलकर्त्याने बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स अभ्यासक्रमाविषयी एकूण तीन मुद्दयांची माहिती मागितली आहे. दि. १३.११.२००६ रोजी माहिती विनाशुल्क देण्यात आली आहे, असे सहाय्यक जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. अपीलकर्त्याने माहिती प्राप्त झाल्याचे मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २४.५.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विठ्ठल शिवराम विनोद
श्रध्दा गार्डन, गावडे पार्क, चिंचवड, पुणे-३३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विठ्ठल शिवराम विनोद
श्रध्दा गार्डन, गावडे पार्क, चिंचवड, पुणे-३३

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
प्रतिनिधी (१)श्री.मनोहर गायकवाड (२)श्री.बी.डी.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ श्री.बी.एन.कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.५.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>(१)लिफ्टमन पदासाठी पुर्नसुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने दि.१९.११.१९९६ पासून दि.३.६.२००५ पर्यंत दिलेल्या निवेदनावर महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीची माहिती.<br>(२)महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांच्या दि.३ ऑगस्ट १९९९ च्या पत्राच्या अनुषंगाने प्रशासन विभागाने घेतलेल्या निर्णयाच्या प्रती.<br>(३)स्थायी समिती ठराव क्र.११८६० विषय क्र.५२, दि.४.१०.२००१ च्या सक्षम समितीने घेतलेलया निर्णयावर केलेल्या कार्यवाहीबाबतच्या पत्रव्यवहाराच्या प्रती.<br>(४)दि.१९.११.१९९६, ३१.३.१९९९, १२.१२.२००१, १.२.२००३, २३,४,२००२,३.६.२००५ अखेर लिफ्टमन कर्मचाऱ्यांनी/संघटनांनी केलेल्या मागणीवर ठराव क्र.५०६१ दि.४.१२.२००३ च्या सभेत व तत्कालीन आयुक्तांनी घेतलेल्या निर्णयावर प्रशासन/लेखा विभागाने केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती.<br>(५)शासन निर्णय क्र.एसआरव्ही/१०९५/प्र.क्र.१/९५/१२, मंत्रालय, मुंबई ३२, दि.८.६.१९९५ व क्र.एसआरव्ही /१०९५/प्र.क्र.३३/९५ व क्र.एसआरव्ही/१०९६/प्रक्र३३/९५/१२, दि.२०.३.१९९७ चे अनुषंगाने वर्ग ३-४ च्या कर्मचाऱ्यांना (समकक्ष वेतनश्रेणी धारण करणाऱ्या)लागू केलेल्या वेतनश्रेणींची माहिती, नेमणुकीचे पद,वर्ग, देय वेतनश्रेणी व दिलेली वेतनश्रेणी योग्य असल्यास गॅझेटमध्ये मनपाने घेतलेल्या निर्णयाची नोंद आहे का, शासन निर्णयासह पत्रव्यवहाराच्या प्रती.<br>(६)लेखा/३/कावि/३१८/०५, दि.२४.६.२००५ वर्ग-४ चे कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीतील त्रुटीबाबत पाठविलेल्या माहितीच्या प्रती. | |

## विवेचन

लिफ्टमन पदासाठी पुनर्सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने दि.१९.११.१९९६ पासून दि.३.६.२००५ पर्यंत दिलेल्या निवेदनावर महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री.विठ्ठल शिवराम विनोद यांनी जन

माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती समाधानकारक नसल्याच्या कारणावरुन श्री.विनोद यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपील नामंजूर केले. लेखा, प्रशासन, विद्युत ( मुख्य कार्यालय )व कामगार कल्याण या विभागांनी दिलेल्या माहितीचा परामर्श अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निकालपत्रात घेतला आहे. परंतु ही माहिती अपुरी, वस्तुस्थिती लपविणारी व दिशाभूल करुन चुकीची दिली गेली असल्याच्या कारणावरुन श्री.विनोद यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अभिलेखातील संपूर्ण माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका श्री.बी.एन.कांबळे यांनी आयोगापुढील सुनावणीत कागदपत्रांसह नमूद केले. ही माहिती चुकीची आहे असा माझा 'समज' आहे, असे प्रतिपादन श्री.विनोद यांनी केले.त्यांनी केलेल्या लेखी व तोंडी निवेदनात मुख्यत: लिफ्टमनना सुधारित वेतनश्रेणी मिळण्याच्या मागणीबाबत योग्य पध्दतीने कार्यवाही झाली नसल्याचे विस्ताराने नमूद केले आहे. चुकीची माहिती व अपीलकर्त्याच्या दृष्टीने चुकीची असलेली कार्यवाही हे दोन स्वतंत्र विषय आहेत. अभिलेखावरील सर्व माहिती देण्यात आली असल्याचे आयोगाला सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. ती चुकीची असल्याचा अपीलकर्त्याचा 'समज' असणे याने माहिती चुकीची असल्याचे सिध्द होत नाही.

सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही लिफ्टमनना सुधारित वेतनश्रेणी देण्याची अंमलबजावणी होत नाही, ही आपली मुख्य तक्रार असल्याचे श्री.विनोद यांनी नमूद केले. महानगरपालिकेने त्याबाबत शासनाकडे शिफारस केली असून दि.१५.६.२००६ रोजी पत्र पाठविले आहे, परंतु शासनाने अद्याप निर्णय कळविलेला नाही, असे जन माहिती अधिकारी श्री.बी.एन.कांबळे व अपिलीय प्राधिकारी श्री.मनोहर गायकवाड यांनी नमूद केले व श्री.विनोद यांनीही ही वस्तुस्थिती असल्याचे मान्य केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसेल तर तो विषय अपीलकर्त्याने संबंधित न्यायासनापुढे मांडणेच उचित ठरेल. याबाबतची कार्यवाही चुकीची की बरोबर हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

श्री.विनोद यांना या संदर्भात हवी असलेली कोणतीही माहिती देण्यास महापालिका तयार असून अभिलेखांचे अवलोकन करणे किंवा नेमक्या कागदपत्रांची मागणी करणे असे त्यांनी केल्यास आवश्यक ती पूर्तता महापालिका करील, असेही श्री.कांबळे यांनी नमूद केले.

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि.२३.६.२००८

july-०८(june)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर,पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२६/ सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपील कर्ता | श्री. शंकर गुंडिबा भिसे .<br>१३०१ भिसे प्लॉट सुभाष नगर, बार्शी,<br>ता.बार्शी, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, बार्शी,<br>जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसिलदार, बार्शी,<br>जि. सोलापूर | गैरहजर |

अपीलकर्त्याने गौण खनिज (खाण-दगड) ची परवाना अतिरिक्त चोरी बाबतीत कारवाईची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, बार्शी यांच्याकडे मागितली होती. वरील घटकामधील चर्चा व त्यांनी सादर केलेली निवेदने याचा विचार करता संबंधित कार्यालयाने माहिती दिलेली आहे परंतु माहिती चुकीची असल्याची अपीलकर्त्याची तक्रार आहे . खडी परवाना धारकाने जादा दगड उचलल्याबद्दल कारवाई करावी, हा कार्यवाहीचा मुद्दा माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कक्षेत येत नाही .मात्र ही रक्कम वसूल करण्यात आली असल्याचे तहसिलदार, बार्शी, यांनी निवेदनात नमूद केलेआहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २६.०६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत बाळकृष्ण सोनार
मु.पो.पाटणे, ता.चंदगड, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव, श्री माऊली विद्यालय,
तिलारीनगर, ता.चंदगड, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री माऊली विद्यालय,
तिलारीनगर, ता.चंदगड, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२७ / कोल्हापूर / २००७ |
| २ | विशेष अपील निर्गत मोहीम | दि.१३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत बाळकृष्ण सोनार
मु.पो.पाटणे, ता.चंदगड, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव, श्री माऊली विद्यालय,
तिलारीनगर, ता.चंदगड, जि.कोल्हापूर श्री.तुळसाराम लक्ष्मण गावडे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री माऊली विद्यालय,
तिलारीनगर, ता.चंदगड, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | श्री.टी.एल.गावडे हे आपल्या संस्थेत लेखनिक म्हणून १.७.१९७९ रोजी रुजू झाले होते. त्यावेळी आपल्या संस्थेकडे स्वत:ची जन्मतारीख दर्शविणारी कागदपत्रे हजर केली आहेत. त्या कागदपत्रांच्या सहीशिक्क्याच्या नकला. |

## विवेचन

तिलारी शिक्षण मंडळाचे मुख्याध्यापक व सचीव श्री.तुळसाराम लक्ष्मण गावडे यांच्या जन्मतारखेची नेमकी माहिती मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.वसंत बाळकृष्ण सोनार यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री माऊली विद्यालय, तिलारीनगर, ता.चंदगड, जि.कोल्हापूर यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकारी व सचीव म्हणून अपिलीय प्राधिकारी स्वत: श्री.गावडे हेच असल्यामुळे त्यांनी खोटी माहिती दिली असल्याचे नमूद करुन श्री.सोनार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

कोल्हापूर येथील विशेष अपील निर्गत कार्यक्रमात दि.१३.५.२००८ रोजी या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. परंतु यामध्ये एकमत न झाल्यामुळे नमुनापत्रात नमूद केलेल्या माहितीच्या व उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यात आला.

संस्थांतर्गत वादाची पार्श्वभूमी असलेला हा विषय आहे. न्यायालये, शिक्षणाधिकारी कार्यालय, धर्मादाय आयुक्त कार्यालय आदी विविध ठिकाणी या संदर्भातील श्री.सोनार व अन्य सबंधितांचे अर्ज, तक्रारी गेल्या काही वर्षात करीत आले आहेत. उभय बाजूंनी आयोगाला सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये परस्परांवर अनधिकृतपणाचे, गैरकारभाराचे व भ्रष्टाचाराचे आरोप केलेले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत त्याचा विचार करण्याचे कारण नाही. 'श्री.गावडे यांनी जन्मतारखेबाबत तफावत असलेली कागदपत्रे सादर करुन शासनाची फसवणूक करण्याच्या उद्देशाने स्वत: बोगस रेकॉर्ड तयार केल्याबाबतच्या नकला मिळाव्यात', अशी श्री.सोनार यांची मागणी आहे. या मागणीत अनेक गोष्टी गृहीत धरलेल्या असून अनुषंगिक पुरावे सादर केलेले नाहीत. उपशिक्षणाधिकारी श्री.पी.टी.पाटील यांनी श्री.गावडे यांच्या जन्मतारखेच्या

संदर्भात चौकशी केल्याचे श्री.सोनार यांनी नमूद केले आहे. परंतु त्यांच्या निष्कर्षाची अधिकृत प्रत उभय बाजूंपैकी कोणीही आयोगाला सादर केलेली नाही. श्री.गावडे यांनी श्री.सोनार यांच्या माहिती मागणीच्या सर्व अर्जांना उत्तर व अनुषंगिक माहिती दिली असल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसते. श्री.गावडे हेच मुख्याध्यापक व् संस्थेचे सचीव म्हणून काम करीत असल्याचा दाखला श्री.सोनार यांनी मागितला असून त्याबाबतही श्री.गावडे यांनी उत्तर दिले आहे. श्री.गावडे यांनी जन्मतारखेचे खरे पुरावे दिलेले नाहीत, दिलेले पुरावे खोटे असून ती फसवणूक आहे, असे श्री.सोनार यांनी विशेष अपील कार्यक्रमांतर्गत नमुनापत्रात नमूद केले आहे, तर आपण सर्व कागदपत्रे अपीलकर्त्याला पुरविली असून खरी माहिती दिली आहे, असे श्री.गावडे यांनी नमूद केले आहे.

उभय बाजूंनी अनेक कागदपत्रे आयोगाला सादर केली असून त्यात आरोप - प्रत्यारोप, परस्परांविरुध्दची निवेदने, परस्परांविरुध्द विविध पातळ्यांवर असलेल्या तक्रारी, त्या अनुषंगाने संबंधितांची निवेदने याचा समावेश आहे. संस्थांतर्गत वादातून होणाऱ्या तक्रारी व त्याच्याशी संबंधित अशी ही कागदपत्रे असून त्यांची दखल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत घेण्याचे कारण नाही. तसेच आरोप प्रत्यारोपांमधील सत्यता हा आयोगापुढील विषय नाही. मात्र संस्थेचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी एकच असणे योग्य नाही. संस्थेचे मुख्याध्यापक जन माहिती अधिकारी व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर हे अपिलीय प्राधिकारी अशीच व्यवस्था असली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.७.६.२००८**

july-०८-११

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्ता नारायण राणे
लालनगर, घर नं.१२७६/३८८,
इचलकरंजी, हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प,
सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३७ (१५१)/कोल्हापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि.१३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री.आर.आर.केडगे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प,
सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर श्री.एस.व्ही.जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.१०.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>प्राथमिक मजूर सहकारी संस्थेच्या दि.११.९.२००६ ते २१.२.२००७ अखेर निघालेल्या धनादेशांची माहिती. |
|---|---|

## विवेचन

प्राथमिक मजूर सहकारी संस्थेच्या दि.११.९.२००६ ते २१.९.२००७ या काळात निघालेल्या धनादेशांची माहिती अपीलकर्ता श्री.दत्ता नारायण राणे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यासाठी रुपये ३७०/- शुल्क भरण्यास कळविले. जुन्या अभिलेखातून माहिती संकलित करणे, टंकलिखित करणे यासाठी कर्मचाऱ्यांच्या एका दिवसाच्या रु.३३०/- पगारासह रुपये ३७०/- एवढे शुल्क जन माहिती अधिकारीऱ्यांनी कळविले. त्यानंतर रुपये ३७०/- ऐवजी रुपये ३४१/- शुल्क होत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यांना कळविले. श्री.राणे यांनी त्याला आक्षेप घेतला व जादा शुल्क आकारले जात असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांच्या निदर्शनास आणले. माहितीसाठीचे रुपये ११/- शुल्क वगळता जादा ३३०/- रुपये शुल्क आकारल्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले व हे जादा शुल्क परत घेऊन जाण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्वीच श्री.राणे यांना कळविले असल्याचे नमूद करुन, अशा पध्दतीने अवाजवी शुल्क न आकारण्याची समज जन माहिती अधिकाऱ्यांना दिली. जादा शुल्क व विलंब याबाबत श्री.एस.व्ही.जाधव यांना शास्ती लावावी व त्यांची खातेनिहाय चौकशी करावी, अशी मागणी श्री.राणे यांनी प्रथम अपिलात केली होती. शास्तीचा अधिकार आपल्याला नसल्याचे स्पष्ट करुन जन माहिती अधिकाऱ्यांना समज देण्याच्या निर्णयासह अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री.आर.आर.केडगे यांनी अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री.राणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. माहिती देण्याबाबत आपल्याला त्रास दिला गेला, जाणीवपूर्वक जादा शुल्क सांगितले गेले, असे करणारे अधिकारी श्री.एस.व्ही.जाधव यांना निलंबित करुन त्यांची खातेनिहाय चौकशी व्हावी अशी मागणी श्री.राणे यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलात केली आहे.

कोल्हापूर येथील विशेष अपील निर्गत कार्यक्रमात दि.१३.५.२००८ रोजी या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. परंतु यामध्ये तडजोड न झाल्यामुळे नमुनापत्रात नमूद केलेल्या माहितीच्या व उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यात आला.

अधीक्षक अभियंता श्री.आर.आर.केडगे व कार्यकारी अभियंता श्री.एस.व्ही.जाधव यांनी कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला असून तो दडपण्यासाठीच वेगवेगळ्या वेळी मागितलेली माहिती नाकारली जाते असे श्री.माने यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. मजूर सहकारी संस्था स्वत: कामे करीत नसून त्यांच्या नांवाबरची कामे ठेकेदारांना दिली जातात. मजूर संस्थेचे अध्यक्ष व कार्यकारी अभियंता श्री.जाधव संगनमताने अशी कामे करतात, अशा स्वरुपाचे आरोप श्री.राणे यांनी लेखी निवेदनात केले आहेत. तसेच प्रशासनाकडे केलेल्या तशा स्वरुपाच्या अर्जांच्या प्रतीही सादर केल्या आहेत, व अशा अधिकाऱ्यांना निलंबित करुन त्यांच्या कारभाराची चौकशी व्हावी अशी मागणी केली आहे. अशी कार्यवाही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. तसेच माहितीच्या मागणीशी त्यांचा संबंध नाही, त्यामुळे त्याची दखल आयोगाने घेण्याचे कारण नाही. मात्र मागितलेली माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी श्री.एस.व्ही.जाधव व अपिलीय प्राधिकारी श्री.आर.आर.केडगे यांचा दृष्टिकोन सकारात्मक असल्याचे कागदपत्रावरुन दिसत नाही.

'माहिती देण्यास विलंब झालेला नाही, परंतु पावसाळ्यातील कामाच्या व्यापामुळे आणि माहित अधिकाराच्या तरतुदींचा अर्थबोध न झाल्याने नजरचुकीने माहिती देण्यासाठी रु.३३०/- इतकी जादा फी आकारण्यात आलेली होती. त्यांनतर अर्जदार यांनी अपील दाखल केल्यानुसार अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित करुन फी परत करण्याचे आदेश दिले, त्यानुसार फी परत केलेली आहे', असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.एस.व्ही.जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता श्री.आर.आर.केडगे यांनी विशेष अपील निर्गत कार्यक्रमाच्या वेळी नमुनापत्रात नमूद केले आहे. माहिती मागणीचा अर्ज दि.२८.३.२००७ चा आहे. त्यावेळी पावसाळ्यातील कामाच्या व्यापाचा संबंध येत नाही. तसेच माहीचा अधिकारी अधिनियम २००५ अस्तित्वात येऊन तेव्हा दीड वर्ष झाले होते. त्यामुळे तरतुदींचा अर्थबोध न होण्याचे कारण

नाही. २००६-०७ सालातील माहिती 'जुन्या' अभिलेखावरुन संकलित करावी लागणारी असल्याचे म्हणणे ( तेही एप्रिल २००७ मध्ये), तसेच माहिती संकलित करणाऱ्या कर्मचाऱ्याचा एक दिवसाचा शासनदेय पगार रुपये ३३०/- माहितीचे शुल्क म्हणून नमूद करणे हे आक्षेपार्ह आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्काबाबतची चूक कबूल केली व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ही जादा रक्कम परत करण्याचा आदेश दिल्यानंतर अपीलकर्त्याला परत केली. हे योग्य केले असले तरी एका पानाच्या माहितीसाठी ११/-रुपये आकारणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद केलेल्या रु.२/- प्रतिपृष्ठ या तरतुदीचा भंग करणारे आहे.

जन माहिती अधिकारी श्री.एस.व्ही.जाधव व अपिलीय प्राधिकारी श्री.आर.आर.केडगे यांनी शुल्काबाबत चूक कबूल करुन स्पष्टीकरण दिले आहे. तसेच अर्जदाराला उत्तर पाठविणे आदी बाबी विहित मुदतीत पार पाडल्या आहेत.

उभय बाजूंची निवेदने व अनुषंगिक कागदपत्रे लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कार्यवाहीबाबत तत्परतेने व योग्य अशीच कृती करण्याची समज जन माहिती अधिकारी श्री.एस.व्ही.जाधव व अपिलीय प्राधिकारी श्री.आर.आर.केडगे यांना देण्यात येत आहे.

(३) अपीलकर्त्यास आकारलेले शुल्क योग्य नसल्यामुळे रु.११/- जन माहिती अधिकारी श्री.एस.व्ही.जाधव यांनी अपीलकर्त्यास व्यक्तिशः परत करावेत.

(४) पुरावे सादर न करता संबंधित अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप करुन निलंबनासारख्या कारवाईच्या अतिव्याप्त मागण्या करणे माहितीच्या अधिकाराच्या कक्षेत येत नाही. त्याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.४.६.२००८**